**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार, दिनांक ०८ एप्रिल २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विकास हाच महायुतीचा निर्धार असल्याचं पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांचं चंद्रपूरच्या प्रचारसभेत प्रतिपादन.**
2. **दुसऱ्या टप्प्यात राज्यात अंतिम निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २०४: अमरावती मधून सर्वाधिक ३७ उमेदवार रिंगणात.**
3. **नेता, नीती आणि नियत असलेला पक्ष परिवर्तन घडवून आणू शकतो- वर्ध्यातील हिंगणघाट इथं महायुतीच्या प्रचारसभेत योगी आदित्यनाथ यांचं प्रतिपादन.**
4. **काल गृह मतदानाच्या पहिल्या दिवशी भंडारा जिल्ह्यात ५३६ मतदारांनी बजावला मतदानाचा हक्क.**

**आणि**

5. **विदर्भात पुढील ३ दिवस वादळी पर्जन्यमानाची शक्यता, सतर्कतेचा येल्लो अलर्ट जारी.**

*****

पंतप्रधान नरेंद्र मोदी-चंद्रपूर प्रचार सभा

विकास हाच महायुतीचा संकल्प आहे. गेल्या १० वर्षांत आम्ही जलद गतीनं सर्वांगीण विकास करण्यावर भर दिला, असं प्रतिपादन पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी चंद्रपूरच्या प्रचारसभेत केलं. विरोधकांवर टीका करताना एक स्थिर सरकार किती आवश्यक आहे ते महाराष्ट्रातील जनतेला समजू शकत असं ते म्हणाले. मागास, गरीब आदिवासी सर्वच मोदी सरकारला आपलं मानतात असा विश्वास देखील त्यांनी व्यक्त केला. चंद्रपूर आणि गडचिरोली लोकसभा मतदारसंघाच्या उमेदवारांच्या चंद्रपुरात आयोजित प्रचार सभेला ते संबोधित करत आहेत. यावेळी मंचावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सह, सुधीर मुनगंटीवार, अशोक नेते आणि महायुतीचे अन्य नेतेही उपस्थित आहेत. आपण केलेल्या विकास कामांमुळे लोक आपल्याला निवडून देतील असा विश्वास यावेळी चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार

सुधीर मूनगंटीवार यांनी सभेच्या सुरवातीला व्यक्त केला. तत्पूर्वी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी उपस्थितांना महायुतीचे उमेदवार निवडून देण्याचा आग्रह केला. यानंतर १० तारखेला पंतप्रधान कन्हान इथं रामटेक लोकसभा मतदार संघातल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा घेणार आहेत.

दूसरा टप्पा:अर्ज मागे

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातल्या मतदानापूर्वी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा आज शेवटचा दिवस होता. या टप्प्यात १२ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमधल्या ८८ लोकसभा मतदारसंघांमधे निवडणूक होणार आहे. राज्यातल्या बुलढाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड आणि परभणी या ८ लोकसभा मतदारसंघात दुसऱ्या टप्प्यात २६ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. छाननीनंतर राज्यातल्या आठ मतदारसंघात २९९ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. त्यात नांदेडमधे सर्वाधिक ६६ अर्ज वैध ठरले आहेत. अमरावतीमध्ये ५६, हिंगोलीत ४८, परभणीत ४१, वर्ध्यात २६, बुलडाण्यात २५, यवतमाळ-वाशिममध्ये २०, आणि अकोल्यात १७ अर्ज वैध ठरले आहेत. मात्र वैध ठरलेल्या एकूण २९९ उमेदवारांपैकी अंतिम निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची संख्या २०४ इतकी असून अमरावती मधून सर्वाधिक ३७ उमेदवार रिंगणात आहे.

योगी आदित्यनाथ

नेता, नीती आणि नियत असलेला पक्ष परिवर्तन घडवून आणू शकतो असं प्रतिपादन उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री आणि भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते योगी आदित्यनाथ यांनी केलं. ते आज वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाट इथं महायुतीचे वर्धा लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार रामदास तडस यांच्या प्रचारार्थ आयोजित सभेला संबोधित करत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या १० वर्षात केलेल्या विकास कामांचा उल्लेख त्यांनी यावेळी केला. भारतीय जनता पार्टी कडे नेता, नीती आणि नियत असे सगळेच आहे. मोदी यांच्या नेतृत्वात देश सर्व क्षेत्रात विकासाची भर घालत आहे. विकासाची हीच गती कायम ठेवायची असेल तर वर्धा लोकसभा मतदार संघात पुन्हा एकदा रामदास तडस यांना विक्रमी मतांच्या अंतरान निवडून देण्याचं आवाहन त्यांनी उपस्थितांना केलं.

व्हीबीए निवडणूक चिन्ह

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला प्रेशर कुकर हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे. वंचित बहुजन आघाडीनं गॅस सिलेंडर हे निवडणूक चिन्ह मागितलं होतं. मात्र ड्रॉमध्ये हे चिन्ह मिळालं नाही. आता अकोल्यात भाजपचे कमळ,

काँग्रेसचा पंजा आणि वंचित बहुजन आघाडीच्या प्रेशर कुकरमध्ये तिरंगी लढत निश्चित झाली आहे.

गडकरी लोकसंवाद

केंद्रीय मंत्री  आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नितीन गडकरी यांच्या लोकसंवाद यात्रेचं आज नागपुरातील तांडापेठ, हंसापुरी, मोमीनपुरा इथं  स्वागत करण्यात आलं. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येनं  सहभाग नोंदवला. मध्य नागपुरातील बारईपुरा-राऊत चौक येथून यात्रेला प्रारंभ झाला होता.

पारवे सभा

कळमेश्वर, काटोल आणि नरखेड तालुक्यात रामटेक लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीद्वारे नमो संवाद यात्रा काढण्यात आली. यावेळी कळमेश्वर येथील प्रचार सभेत भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी महायुतीचे रामटेक लोकसभा निर्वाचन क्षेत्राचे उमेदवार राजू पारवे यांच्यासाठी मतदारांना साद घातली. सावनेर क्षेत्राच्या विकास कामांना पुढं नेण्यासाठी महायुतीचा उमेदवार जिंकणं महत्वाचं असल्याचं प्रतिपादन त्यांनी यावेळी केलं.

शासकीय निवासस्थान

मुख्यमंत्र्याचे अधिकृत शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा निवासस्थानाचा राजकीय कारणासाठी वापर झाल्यामुळे अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या नोटिशीला उत्तर मिळाल्यावर कारवाई होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. याप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यामुळे मुंबई शहर जिल्हाधिकारी यांनी नोटीस बजावल्याचे ते म्हणाले. याशिवाय कोणत्याही शासकीय निवासस्थानाचा वापर राजकीय कारणांसाठी करता येणार नाही असे निर्देश निवडणूक आयोगानं मुख्य सचिवांना दिले आहे.

रामदास आठवले चंद्रपूर

लोकसभा निवडणुकीत राज्यातल्या ४८ पैकी ४५ पेक्षा जास्त  जागा  महायुती मोठ्या मताधिक्यानं जिंकेल, असा विश्वास रिपाई अध्यक्ष, केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. ते आज चंद्रपूर इथं बातमीदारांशी बोलत होते. राज्याचे वन आणि सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रचारार्थ नरेंद्र मोदी यांच्या जाहीर प्रचार सभेसाठी ते चंद्रपुरात उपस्थित आहे.

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण परभणी लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

गृह मतदान

निवडणूक आयोगानं पहिल्यांदाच दिव्यांग मतदारांना आणि 85 वर्षांहून अधिक मतदारांना गृह मतदानाचा हक्क उपलब्ध करून दिला. त्यानुसार भंडारा जिल्ह्यात 536 मतदारांनी काल गृह मतदान करत मतदानाचा हक्क बजावला. आयोगाच्या वतीनं पहिल्यांदाच गृह मतदान हा उपक्रम घेण्यात आला आहे ज्यात भंडारा जिल्ह्यातील मतदारांनी सक्रिय सहभाग घेतला. जिल्ह्यात काल ७ एप्रिल रोजी गृह मतदानाच्या पहिल्या दिवशी भंडारा विधानसभा क्षेत्रात 8 चमू तर साकोली मध्ये 13 चमू, तुमसर मध्ये १२ चमू अश्या एकूण 33 चमुनी गृह मतदानाचं कार्य आयोगाच्या निर्देशानुसार पार पाडलं. त्यामध्ये भंडारा तालुक्यातून 139, साकोली तालुक्यातून १८९, तर तुमसर तालुक्यातील 208 नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला. विशेषता ८५ वर्षांवरील मतदारांमध्ये स्त्रियांची संख्या लक्षणीय होती.

निवडणूक मतदार जागृती

लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढावी, याकरता अमरावतीत निवडणूक मतदार जागृती स्वीप उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात येत आहे. विभागिय क्रीडा संकुलात आज सकाळी पाच हजार विद्यार्थी, नागरीक आणि युवा मतदारांनी मानवी साखळी तयार करत मतदानाबाबत जनजागृती केली. मानवी साखळीच्या माध्यमातून मतदान प्रक्रियेत सहभाग नोंदवून मतदारांना मतदानानाचा हक्क बजावण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आलं. तर वाशीम जिल्ह्यातल्या मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी मालेगाव तहसील कार्यालयानं काल एका लग्नसोहळ्यात मतदार जनजागृती केली. या सोहळ्यासाठी जमलेल्या वऱ्हाडी मंडळींना मतदान करण्याची विनंती करून या कार्यालयानं काल मतदार जनजागृतीचा एक अनोखा उपक्रम राबवला. त्यासाठी मालेगाव तहसील कार्यालयाच्या निवडणूक विभागातल्या कर्मचाऱ्यांनी मंडपात विशिष्ट ठिकाणी सेल्फी पॉईंटची रचना केली होती.

सुविधा पोर्टल

निवडणुकांची घोषणा आणि आदर्श आचारसंहिता अंमलात आल्यानंतर केवळ 20 दिवसांच्या कालावधीत सुविधा या मंचावर राजकीय पक्ष आणि उमेदवारांकडून परवानग्या मागणारे 73 हजार 379 इतक्या मोठ्या संख्येन अर्ज प्राप्त झाले आहेत आणि त्यापैकी 60% विनंत्या मंजूर करण्यात आल्या आहेत. सुमारे 11 हजार 200 विनंत्या नाकारण्यात आल्या आहेत आणि 10 हजार 819 अर्ज अवैध किंवा नक्कल असल्याचे आढळल्यावर रद्द करण्यात आले आहेत. 7 एप्रिल 2024 पर्यंत उपलब्ध असलेल्या तपशीलानुसार उर्वरित अर्जांची छाननी प्रक्रिया सुरू आहे.

हवामान

पुढील २ दिवस पूर्व विदर्भातील नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली आणि गोंदिया इथं मेघगर्जनेसह हलक्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे. यासाठी सतर्कतेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर पश्चिम विदर्भात यवतमाळ, बुलढाणा वाशिम, अमरावती, अकोला इथं आज पासून 12 एप्रिल पर्यन्त मेघगर्जनेसह हलक्या पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

अभ्यास भेट

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या स्नातकोत्तर मराठी विभागातर्फे नुकतीच 'विदर्भ साहित्य संघा'च्या ग्रंथालयाला शैक्षणिक अभ्यास भेट देण्यात आली. ह्या भेटीदरम्यान विदर्भ साहित्य संघा'च्या ग्रंथालयातील ग्रंथपाल माधुरी वाडीभस्मे यांनी ग्रंथालयाचा इतिहास आणि तेथील प्रशासकीय कामकाज यांची माहिती दिली. प्रकाश एदलाबादकर यांनी 'विदर्भ साहित्य संघा'चा इतिहास, त्यांची आजपर्यंतची वाटचाल तसंच विविध साहित्यिक उपक्रम ह्याविषयी माहिती सांगितली. ह्या अभ्यास भेटीला 'विदर्भ साहित्य संघा'चे अध्यक्ष प्रदीप दाते हे उपस्थित होते.

महावितरण

महावितरणच्या नागपूर परिक्षेत्राअंतर्गत अमरावती इथं पार पडलेल्या दोन दिवसीय नाट्यस्पर्धेत अकोला परिमंडलान सादर केलेल्या ‘नथिंग टू से’ या नाट्यप्रयोगान सर्वोत्तम नाटकाच्या पुरस्कारासह विविध वर्गवारीतील सहा प्रथम आणि एक व्दितीय पुरस्कार पटकावून बाजी मारली.

*****